कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

"सुधारीत" [illegible] जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/कवि/३०४-२११

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

श्री/श्रीमती:- मे. [illegible] दिनांक :- ११/११/२०११

~~कुलमुखत्यारधारक :- श्री.~~ [illegible]

वास्तुशिल्पकार:- श्री. आशुतोष [illegible]

विषय:- स.नं. [illegible] मौजे- [illegible] येथे बांधकाम करण्याच्या मंजुरीबाबत.

संदर्भ:- १) आपला दि. ४/११/११ रोजीचा श्री. [illegible] यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र.

~~२) [illegible]~~

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ सह कलम ४५ व [illegible] अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार स.नं. [illegible] मौजे- [illegible] मधील ११९२३५६-०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर [illegible] चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडाचा विकास करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ अन्वये बांधकाम परवानगीसाठी केलेल्या दिनांक ४/११/११ च्या अर्जास अनुसरून पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे ~~तळघर, स्टील्ट, [illegible]~~, रहिवासी, दुकाने, ऑफिस [illegible] इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे. इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी आपण जबाबदार राहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे..

इमारत B01 ते B06, B09 ते B11 → स्टील्ट + २१ मजले

इमारत C01, C07 ते C15 → स्टील्ट + ७ मजले

१) हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी मंजूरीपत्राचे नूतनीकरण मुदत संपण्यापूर्वी करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४) ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

५) इमारतीचे बांधकाम मा. सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल.

६) जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे जोत्यापर्यंतचे व जोत्याचे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे, व ते मा. कार्यालयाकडून तपासून घेऊन "जोता पूर्णत्वाचा दाखला" घेण्यात यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.

७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.

८) इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहिल.

९) नकाशात दाखविलेल्या मोकळ्या जागेच्या क्षेत्रामध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करू नये, तसेच [illegible] इमारती भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करू नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये.

१०) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतूदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल.

११) भूखंडाकडे जाण्या-येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल. बांधकाम प्रारंभ [illegible] रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे जाण्या येण्याच्या मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल.

१२) जागेत जुने भाडेकरु असल्यास त्यांच्याबाबत योग्य ती व्यवस्था करण्याची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल व भाडेकरु यांच्यात काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण मालकाने करणे आवश्यक राहिल.

१३) सदर जागेत विहीर असल्यास ती संबंधित विभागाच्या परवानगी शिवाय बुजवू नये.

१४) सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होत असल्यास तो अडविण्यात येऊ नये [illegible] अथवा बंद करू नये.